# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

**प्रेसनोट क्र.६०७ दिनांक २३.०७.२०२०**

## कासा पोलीस ठाणे यांचेकडुन तंबाखुजन्य पदार्थ वाहतुक करणा-या आरोपीतावर कारवाई करुन एकुण ३,५८,५०६/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

दिनांक २२/०७/२०२० रोजी १७:३० वा. कासा पोलीस ठाणे हद्दीतील चारोटी घोळ टोलनाका येथे मुंबई वाहीनीचे तिसरे लेनवर जि.पालघर येथे आरोपीत नामे १) नसीम अमीष मोमीन, वय ३० वर्ष, रा.ता.भिवंडी जि.ठाणे, २)आवेश अल्लाउद्दिन मोमीन, वय ३८ वर्ष, रा. ता.भिवंडी, जि.ठाणे, यांनी आपसात संगणमत करुन सफेद रंगाची एसेंन्ट ह्युंडाई कार मध्ये तंबाखुजन्य पदार्थाचा माल हा मानवी आरोग्यास अपायकारक आहे व तो विक्री करता व वाहतुक करण्यास प्रतिबंध केलेला आहे हे त्यांना माहीत असतांनाही त्यांनी शासकीय आदेशाची अवहेलना करुन तो माल वापी गुजरात येथुन भरुन अवैध्य रित्या विक्री करीता वाहतुक करीत असतांना मिळुन आले. आरोपीत यांचे ताब्यातुन १) ४८,७५०/- रु. किंमतीचे केसर युक्त विमल पान मसाला जांभळया रंगाचे ३२५ पॅकेट २) ९,७५०/- रु. किंमतीचे वि - १ तंम्बाखुचे हिरवे रंगाचे ३२५ पॅकेट, ३) ३,००,०००/- रु. किंमतीची सफेद रंगाची एसेंन्ट ह्युंडाई कार नं. एम.एच. ४३ बी.ए. १८७८ असा एकुण ३,५८,५०६/- रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीत याचे विरुध्द कासा पोलीस ठाणे गु.र.नं. I १२३/२०२० भा.द.वि.स.क. ३२८, २७२, २७३, १८८, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले असुन पुढील तपास सुरु आहे. सदर गुन्हयातील आरोपीत यांना दि.२२/०७/२०२० रोजी अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई सहा.पोलीस निरीक्षक श्रीमती सिध्दवा जायभाये, प्रभारी अधिकारी कासा पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली कासा पोलीस ठाणेचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

Scanned with CamScanner